(इंग्रजी टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

**बॉम्बे येथील उच्च न्यायालयात**

**फौजदारी अपीलीय न्यायाधिकारक्षेत्र**

**फौजदारी अपील क्रमांक २४७/२०१७**

विकास यशवंत मडावी

वय : ४२ वर्षे

राहणार :तुकाराम निवास,

१६८/२/७, सेक्टर- ९,

दिवेगाव, ऐरोली,

नवी मुंबई, ठाणे

व्यवसाय : चायनीज फूड स्टॉलचा  मालक रेसिडेन्स  च्या समोर

**...... अपीलकर्ता**

**विरुद्ध**

1. महाराष्ट्र राज्य

रबाळे पोलिस स्टेशन, ठाणे,

नवी मुंबई .

2. कु. एक्स (अज्ञान)

**...... उत्तरार्थी**

अपीलकर्त्यातर्फे श्री.अभयकुमार आपटे.

उत्तरार्थी क्रमांक १-राज्यासाठी श्री.एस.व्ही.गावंड, सहायक सरकारी अभियोक्ता (ए. पी. पी).

**न्यायवृंद : न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे.**

**दिनांक : ९ फेब्रुवारी २०२१.**

**न्यायनिर्णय:**

१. या अपिलाद्वारे अपीलकर्त्याने दिनांक १६/१२/२०१६ रोजी ठाणे येथील विद्वान जिल्हा न्यायाधीश-०८ व विशेष न्यायाधीश (पॉक्सो अधिनियम ) यांनी दिलेला न्यायनिर्णय व आदेशावर आक्षेप घेतला आहे आणि ज्यात त्याला खालीलप्रमाणे दोषी ठरवून शिक्षा सुनावली आहेः

-भारतीय दंड संहितेच्या कलम ३७६ (२) (च) (१) अन्वये दंडनीय गुन्ह्यासाठी १० वर्षे सक्तमजुरी व रु.१०,०००/- द्रव्यदंडाची शिक्षा ,आणि द्रव्यदंड न भरल्यास आणखी ६ महिने सक्तमजुरी ची शिक्षा भोगावी लागेल;

-बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम २०१२ च्या कलम ४ सह कलम ३ (ब) अन्वये दंडनीय गुन्ह्यासाठी ७ वर्षे सक्तमजुरी व रु.५००/- द्रव्यदंडाची शिक्षा, द्रव्यदंड न भरल्यास पुढील १० दिवस साधी कारावासाची शिक्षा भोगावी लागेल;

- बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम २०१२ च्या कलम ६ सह कलम ५ (एम) अन्वये दंडनीय गुन्ह्यासाठी १० वर्षे सक्तमजुरी व रु.५००/- द्रव्यदंडाची शिक्षा , द्रव्यदंड न भरल्यास पुढील १० दिवस साधी कारावासाची शिक्षा भोगावी लागेल;

-भारतीय दंड संहितेच्या कलम ३४२ अन्वये दंडनीय गुन्ह्यासाठी, रु.५००/- द्रव्यदंडाची शिक्षा, द्रव्यदंड न भरल्यास पुढील १० दिवस साधी कारावासाची शिक्षा भोगावी लागेल;

-भारतीय दंड संहितेच्या कलम ३६१ अन्वये दंडनीय गुन्ह्यासाठी ६ महिने सक्तमजुरी व रु.५००/- द्रव्यदंडाची शिक्षा, द्रव्यदंड न भरल्यास पुढील १० दिवसांची साधी कारावासाची शिक्षा भोगावी लागेल.

वरील सर्व शिक्षा एकाच वेळी चालवण्याचे निर्देश देण्यात आले होते.

तथापि, अपीलकर्त्याला भारतीय दंड संहितेच्या कलम ३५४, ३७७ , ५११ आणि १७२ अंतर्गत आणि लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम , २०१२ च्या कलम ५(i) अंतर्गत दंडनीय गुन्ह्यांमधून दोष मुक्त करण्यात आले.

२. अभियोगपक्षाचे थोडक्यात म्हणणे असे आहे की;

दिनांक ०४/१२/२०१२ रोजी साडेतीन वर्षांची पीडित मुलगी (पुढे 'एक्स' असे संबोधले जाते) आणि तिची चुलत बहीण [अभियोग साक्षीदार क्रमांक -५ (पीडब्ल्यू- ५)] वय ५ वर्ष त्यांच्या इमारतीला लागून असलेल्या खेळाच्या मैदानावर खेळण्यासाठी गेल्या होत्या. अभियोगपक्षाचे म्हणणे असे आहे की, सायंकाळी सात च्या सुमारास 'एक्स' आणि तिची चुलत बहीण [अभियोग साक्षीदार क्रमांक -५ (पीडब्ल्यू- ५)] अपीलकर्त्याच्या घरी खेळण्यासाठी गेले होते. अपीलकर्त्याची वहिनी - अनु माधवी ही फिर्यादीची (एक्सची आई) ओळखीची होती. रात्री ८.३० च्या सुमारास अपीलकर्ता 'एक्स' आणि पी.डब्ल्यू-५ ला घेऊन आल्याचा आरोप आहे. अपीलकर्त्याने आईस्क्रीमचा पॅक आणला होता, तो मुलींना वाटण्यास सांगितला होता. रात्री १०-१०.३० च्या सुमारास 'एक्स'ने तिच्या गुप्तांगाजवळ (प्रायव्हेट पार्ट) दुखत असल्याची तक्रार

केली आणि रडायला सुरुवात केली.फिर्यादीने 'एक्स'ला काय झाले असे विचारले असता, 'एक्स'ने खुलासा केला की, अपीलकर्त्याने तिचा निकर काढला होता आणि तिला पलंगावर ठेवल्यानंतर तिच्या गुप्तांगात (प्रायव्हेट पार्ट )बोट घातले होते; आणि जेव्हा ती रडू लागल्यावर अपीलकर्त्याने तिला घरी परत आणले. फिर्यादीने ५ वर्षांच्या पी.डब्ल्यू-५ ला याबाबत विचारले असता, पी.डब्ल्यू-५ ने सांगितले की, अपीलकर्त्याने 'एक्स'ला बेडरूममध्ये नेऊन दरवाजा बंद केला होता. पी.डब्ल्यू-५ ने दिलेल्या माहितीनुसार, तिने दरवाजा उघडला तेव्हा तिच्या लक्षात आले की, 'एक्स' पलंगावर आहे आणि आरोपी तिचा निकर घालत आहे. त्यानुसार एक्सच्या आईने रबाळे पोलिस स्टेशन, ठाणे येथे अपीलकर्त्याविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम ३४२, ३६१, ३७६, ३७७, ५११, ३५४ आणि १७२ तसेच लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ३ (ब), ५ (आय) आणि ५ (एम) अन्वये दंडनीय गुन्ह्यांची तक्रार/एफआयआर दाखल केली. अन्वेषणानंतर विशेष न्यायालयात अपीलकर्त्याविरुद्ध दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

३. अपीलकर्त्याने आरोपांबद्दल दोषी नसल्याची कबुली दिली आणि खटला चालवण्याचा दावा केला.

४. अभियोग पक्षाने आपल्या खटल्याच्या समर्थनार्थ पीडब्ल्यू - १- 'एक्स'ची आई आणि फिर्यादी असे सात साक्षीदार तपासले; पीडब्ल्यू- २-इयास अहजाज शेख (पंच ते घटनास्थळाचा पंचनामा); पी.डब्ल्यू- ३ सौ. गीतांजली विजय शिंदे (विशेष कार्यकारी अधिकारी), ज्यांनी 'एक्स' (वय ३ १/२ वर्षे) आणि पी.डब्ल्यू- ५ , वय ५ वर्षे यांचा जबाब नोंदविला; पी.डब्ल्यू- ४ डॉ . सुमेधा मोदी गुप्ता (वैद्यकीय अधिकारी, नवी मुंबई महानगरपालिका रुग्णालय, वाशी); पी.डब्ल्यू- ५- 'एक्सची चुलत बहीण, वय ५ वर्षे; पी.डब्ल्यू- ६- किशोर भिकन भोये (संबंधित

वेळी रबाळे पोलिस ठाण्यात कार्यरत असलेले पोलिस कॉन्स्टेबल) आणि पी.डब्ल्यू- ७- अजित रामचंद्र सुळे (तपासी अंमलदार ). 'एक्स'च्या कोवळ्या वयाचा विचार करता तिची तपासणी करण्यात आली नाही आणि त्यासंदर्भातील पुर्सिस अभियोग पक्षाकडून दाखल करण्यात आली. त्यानंतर फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३ अन्वये अपीलकर्त्याचा जबाब नोंदविण्यात आला. ३१३ च्या निवेदनात अपीलकर्त्याचा बचाव चुकीचा आहे. अपीलकर्त्याचा म्हणण्यानुसार, फिर्यादी आपल्या चुलत भावाच्या घरी राहतो आणि त्याच्यात आणि चुलत भावात वाद असल्याने त्याला खोट्या पद्धतीने अडकवण्यात आले आहे. येथे हे लक्षात घेतले पाहिजे की, अपीलकर्त्याने आपल्या ३१३ च्या जबाबात घेतलेला बचाव साक्षीदारांच्या उलटतपासणीत सुचविल्याप्रमाणे अपीलकर्त्याच्या बचावाच्या विरुद्ध आहे.

अभिलेखातील पुराव्यांचा विचार केल्यानंतर, ठाणे येथील विद्वान विशेष न्यायाधीशांनी परिच्छेद १ मध्ये वर नमूद केल्याप्रमाणे अपीलकर्त्याला दोषी ठरवून शिक्षा सुनावली.

५. अपीलकर्त्याच्या विद्वान वकिलांनी अनेक बाबींवर आक्षेपित न्यायनिर्णय आणि आदेशाला विरोध केला. अपीलकर्त्याला उपरोक्त गुन्ह्यांसाठी दोषी ठरवण्यासाठी अभिलेखातील पुरावे पुरेसे नाहीत, असा युक्तिवाद त्यांनी केला. त्यांनी पुढे असे सादर केले की, 'एक्स' वर लैंगिक अत्याचार झाल्याचे वैद्यकीय पुरावे अभियोग पक्षाच्या खटल्याचे समर्थन करत नाहीत.त्यांनी असे सादर केले की 'एक्स' चे कुटुंब आणि अपीलकर्त्याची वहिनी यांच्यातील काही वादामुळे अपीलकर्त्याला चुकीच्या पद्धतीने अडकवले गेले आहे.

६ . विद्वान सहायक सरकारी अभियोक्ता यांनी (ए. पी. पी) आक्षेपित न्यायनिर्णय आणि आदेशाचे समर्थन केले. त्यांनी असे सादर केले की, कागदोपत्री आणि तोंडी अशा दोन्ही

प्रकारच्या अभिलेखावरील संपूर्ण सामग्रीचा विचार केल्यानंतर, विद्वान न्यायाधीश योग्य निष्कर्षावर पोहोचले आहेत की, अपीलकर्ता वरील गुन्ह्यांसाठी दोषी आहे. लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ च्या कलम २९ अन्वये अपीलकर्त्याने त्याच्यावर टाकलेल्या भारातून मूक्त झाला नाही . त्यांनी असे सादर केले की फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३ अन्वये अपीलकर्त्याने आपल्या जबाबात घेतलेला बचावही भिन्न आहे आणि साक्षीदारांची उलटतपासणी करताना अपीलकर्त्याने घेतलेल्या बचावाच्या विरुद्ध आहे . पी.डब्ल्यू- १ ('एक्सची आई) आणि पी.डब्ल्यू- ५ ('एक्सची चुलत बहीण, वय ५ वर्षे) हे दोन्ही साक्षीदार आत्मविश्वास वाढवतात आणि या पुराव्याला वैद्यकीय पुराव्यांद्वारे म्हणजेच पी.डब्ल्यू - ४ - डॉ. सुमेधा गुप्ता यांच्या पुराव्यांद्वारे पुष्टी मिळते. त्यांनी असे सादर केले की, अपीलकर्त्याने ३ वर्षांच्या अल्पवयीन मुलीचा गैरफायदा घेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केले असून या गुन्ह्यात अपीलकर्त्यांचा सहभाग दर्शविण्यासाठी पुरेसे पुरावे आहेत.

७. अभिलेखावरील पुराव्यांचे अवलोकन केले. अपीलकर्त्याच्या विद्वान वकिलाने आणि विद्वान सहायक सरकारी अभियोक्ता यांनी (ए. पी. पी) मांडलेल्या युक्तिवादांचा विचार केल्यानंतर आणि अभिलेखावरील पुराव्यांचा विचार केल्यानंतर, येथे नमूद केलेल्या कारणांमुळे अपीलकर्त्याला दोषी ठरविण्याच्या निर्णयात आणि आदेशात कोणतीही कमतरता आढळत नाही.

८. पी.डब्ल्यू- १- 'एक्सची आई आणि फिर्यादी यांनी आपल्या पुराव्यात म्हटले आहे की, तिची मुलगी ('एक्स') संबंधित वेळी ३ १/२ वर्षांची होती, आणि ज्युनिअर के.जी मध्ये शिकत होती. पी.डब्ल्यू - १ ने नमूद केले आहे की, ती संबंधित वेळी तिचे आई-वडील, पती, मुलगी ('एक्स'), मुलगा आणि तिची बहीण आणि तिच्या बहिणीच्या दोन मुली (त्यापैकी एक पी.डब्ल्यू

- ५) सोबत राहत होती. पी.डब्ल्यू - १ नुसार, अपीलकर्ता त्यांच्या समोरील घरात राहत होता; हे की  दिनांक ०४/१२/२०१२ रोजी सायंकाळी ७.०० वाजण्याच्या सुमारास तिची मुलगी ('एक्स') व भाची (पी.डब्ल्यू- ५) नेहमीप्रमाणे खेळण्यासाठी फिर्यादीच्या वहिनीच्या घरी गेली होती; रात्री ८.०० च्या सुमारास तिने आपल्या दुसऱ्या भाचीला आपल्या मुलीला आणि पी.डब्ल्यू - ५ ला बोलावण्यासाठी पाठवले; की तिची मुलगी परत आली नाही; की तिच्या भाचीने पी.डब्ल्यू - १ ला सांगितले की ती ('एक्स') अपीलकर्त्याच्या घरी खेळत होती आणि नंतर येईल; हे ऐकताच पी.डब्ल्यू-१ ने बाल्कनीत जाऊन आपल्या मुलीला ('एक्स') हाक मारली आणि तिला घरी येण्यास सांगितले, त्यानंतर अपीलकर्ता गच्चीवर आला आणि तिची मुलगी खेळत असून काही वेळाने येऊन तिला सोडणार असल्याचे सांगितले. पी.डब्ल्यू-१ ने असे म्हटले आहे की, रात्री ८.३० च्या सुमारास अपीलकर्ता आपल्या मुलीला ('एक्स') आणि पीडब्ल्यू- ५ ला घेऊन घरी आला . तिने असे म्हटले आहे की,अपीलकर्त्याने आईस्क्रीम (फॅमिली पॅक) आणले होते आणि ते मुलींना वाटण्यास सांगितले होते. पी.डब्ल्यू-१ नुसार, अपीलकर्त्याच्या उपस्थितीत तिच्या मुलीने ('एक्स') शरीराच्या खालच्या भागात वेदना होत असल्याची तक्रार केली; मात्र, खेळल्यामुळे वेदना होत आहेत, असा विचार करून तिने त्याकडे दुर्लक्ष केले; रात्री १०. ००- १०.३० च्या सुमारास तिची मुलगी ('एक्स') पुन्हा तिच्या गुप्तांगाजवळ (प्रायव्हेट पार्ट) दुखत असल्याची तक्रार केली आणि रडायला सुरुवात केली. पी.डब्ल्यू-१ ने म्हटले आहे की, तिने आपल्या मुलीला उचलले आणि तिचा निकर काढून टाकला. आपल्या मुलीच्या गुप्तांगावर (प्रायव्हेट पार्टवर) रक्त असल्याचे लक्षात येताच तिने आपल्या मुलीला काय झाले असे विचारले, त्यावर तिच्या मुलीने तिला सांगितले की, काकांनी (अपीलकर्त्याने) तिला लघवी किंवा मल करायचे आहे का असे विचारले होते आणि तिला तिचा निकर काढण्यास सांगितले होते;

की जेव्हा तिने अपीलकर्त्याला सांगितले की तिला लघवी किंवा मल करायचा नाही, तरीही काकांनी (अपीलकर्त्याने) तिचा निकर काढून तिला पलंगावर ठेवले आणि तिच्या प्रायव्हेट पार्टमध्ये आपले बोट घातले; की ती रडू लागली आणि तिला घरी जायचे आहे असे सांगितल्यावर काका तिला घरी घेऊन आले. पी.डब्ल्यू- १ ने आपल्या मुलीने ('एक्स') केलेला हा खुलासा ऐकून संबंधित वेळी अपीलकर्त्याच्या घरी आपल्या मुलीसोबत असलेल्या पी.डब्ल्यू- ५ ला याबाबत विचारले. पी.डब्ल्यू - १ ने म्हटले आहे की पी.डब्ल्यू - ५ (वय ५ वर्षे) ने तिला सांगितले की जेव्हा ते हॉलमध्ये खेळत होते, तेव्हा अपीलकर्ता हा 'एक्स' ला बेडरूममध्ये घेवून गेला होता ; की जेव्हा तिने सांगितले की ती देखील बेडरूममध्ये खेळायला येईल, तेव्हा अपीलकर्त्याने तिला नकार दिला आणि तिला सांगितले की तो फक्त 'एक्स' ला आत घेईल; की अपीलकर्त्याने 'एक्स'ला बेडरूममध्ये नेले आणि दरवाजा बंद केला; की काही वेळाने तिने बेडरूमचा दरवाजा उघडला तेव्हा तिच्या लक्षात आले की अपीलकर्ता टॉवेलमध्ये होता आणि 'एक्स' बेडवर होती आणि आरोपी तिला निकर घालत होता. त्यानंतर पी.डब्ल्यू-१ ने हा प्रकार पती आणि आईला सांगितला. सकाळी 'एक्स'ला नवी मुंबईतील रबाळे येथील महानगरपालिका रुग्णालयात नेण्यात आले. 'एक्स'ची तपासणी केल्यानंतर त्यांना वाशीला जाण्यास सांगण्यात आले आणि तेथून त्यांना पुन्हा पोलिस ठाण्यात जाण्यास सांगण्यात आले, जेथे, पी.डब्ल्यू- १ ने रबाळे पोलिस ठाण्यात फिर्याद /एफआयआर दाखल केली. सदरील एफआयआर निशाणी क्रमांक १६ वर आहे. त्यानंतर वाशी येथील नवी मुंबई महानगरपालिका रुग्णालयात वैद्यकीय तपासणीसाठी 'एक्स'ला पाठविण्यात आले.

९. संबंधित साक्षीदाराच्या उलटतपासणीत काही अकृति रेकॉर्डवर आणल्या गेल्या. तथापि, वरील अकृति महत्त्वपूर्ण अकृति आहेत असे म्हणता येणार नाही. ही अकृति पी.डब्ल्यू -

१ ने दिलेल्या काही तपशीलांच्या संदर्भात आहे. पी.डब्ल्यू - १ चा पुरावा सर्व महत्त्वपूर्ण पैलूंशी सुसंगत आहे; 'एक्स' अपीलकर्त्याच्या घरी जाणे; अपीलकर्त्याने तिच्या मुलीला ('एक्स') आणि पी.डब्ल्यू- ५ ला घरी आणणे, त्यांच्यासाठी आईस्क्रीम आणणे ; 'एक्स' ने तिच्या खालच्या पायांमध्ये वेदनेची तक्रार करणे; ही वेदना खेळण्यामुळे होत असावी असे तिला वाटणे आणि अशा प्रकारे त्याकडे दुर्लक्ष करणे;जेवल्यानंतर जेव्हा ते झोपायला जात होते, तेव्हा तिची मुलगी ('एक्स') रडू लागली आणि जेव्हा तिने तिला विचारले तेव्हा तिने सांगितले की तिच्या प्रायव्हेट पार्टमध्ये वेदना होत आहेत आणि काका (अपीलकर्ते) तिला बेडरूममध्ये घेऊन गेले होते, तिचा निकर काढून तिच्या प्रायव्हेट पार्टमध्ये आपले बोट घुसवले होते; की तिला आपल्या मुलीच्या प्रायव्हेट पार्टवर लालसरपणा दिसला; पी.डब्ल्यू - ५ ची चौकशी केल्यावर , पीडब्ल्यू - ५ ने खुलासा केला की अपीलकर्त्याने 'एक्स'ला त्याच्या बेडरूममध्ये नेले होते आणि तिने अपीलकर्त्याला एक्सला निकर घालताना पाहिले होते. या साक्षीदाराच्या उलटतपासणीत तिच्या साक्षीवर विश्वास ठेवता येईल किंवा ती फेटाळली जाईल असे काहीही महत्तवपूर्ण निष्पन्न झालेले नाही.'एक्स'च्या प्रायव्हेट पार्टवरील लालसरपणा हा पडल्यामुळे किंवा कीटक चावल्यामुळे झाला असावा, अशी सूचना संबंधित साक्षीदाराला करण्यात आली असली, तरी तिने ती फेटाळून लावली आहे. अर्जदाराकडून पैसे उकळण्याच्या उद्देशाने त्याच्याविरोधात खोटी तक्रार दाखल करण्यात आली, या सूचनाही पी.डब्ल्यू-१ ने फेटाळून लावल्या आहेत; फिर्यादीचे नातेवाईक व सामाजिक कार्यकर्ते यांनी अपीलकर्त्याची भेट घेऊन त्याच्यावरील खटला मागे घेण्यासाठी रु.२५,००,०००/- ची मागणी केली; आणि घटनेपूर्वी फिर्यादी आणि अपीलकर्ता यांच्यात भांडण झाले होते, ज्यामुळे खोटी तक्रार दाखल करण्यात आली होती.

१० . उक्त साक्षीदाराच्या म्हणजेच पी.डब्ल्यू - १ च्या पुराव्याची पुष्टी 'एक्स' ची चुलत बहीण पी.डब्ल्यू - ५ ने केली आहे. घटनेच्या वेळी पी.डब्ल्यू-५ चे वय ५ वर्षे होते आणि जेव्हा तिची न्यायालयात तपासणी करण्यात आली तेव्हा ती सुमारे ८ वर्षांची होती. शपथेचे पावित्र्य समजल्याने तिला शपथ देण्यात आली. पी.डब्ल्यू - ५ च्या पुराव्यांवरून असे दिसून येते की अपीलकर्त्याने तिच्या चुलत बहिणीला ('एक्स') त्याच्या बेडरूममध्ये नेले होते. तिने म्हटले आहे की सुरुवातीला अपीलकर्त्याने शॉर्ट्स परिधान केले होते आणि नंतर जेव्हा तिने त्याला पाहिले तेव्हा त्याने टॉवेल घातला होता. तिने म्हटले आहे की तिने अपीलकर्त्याला तिच्या चुलत बहिणीला निकर घालताना पाहिले आणि त्यानंतर अपीलकर्त्याने त्यांच्यासाठी आईस्क्रीम आणले. पी.डब्ल्यू-५ ने उलटतपासणीत म्हटले आहे की, घटनेनंतर तिची चुलत बहीण ('एक्स') रडत होती. पी.डब्ल्यू -५ च्या पुराव्याचे अवलोकन केल्यानंतर, तिच्या उलटतपासणीत तिच्या साक्षीवर विश्वास ठेवण्यासारखे काहीही नाही. पी.डब्ल्यू- ५ हा खरा साक्षीदार म्हणून समोर आला आहे. तिची चौकशी केली असता तिने पी.डब्ल्यू-१ ला दिलेल्या माहितीशी तिचा पुरावा सुसंगत आहे.

११. उपरोक्त दोन्ही साक्षीदारांच्या म्हणजेच पी.डब्ल्यू – १ आणि पी.डब्ल्यू - ५ च्या पुराव्यांना पी.डब्ल्यू - ४ ने पुष्टी दिली आहे. पी.डब्ल्यू - ४ डॉ. सुमेधा गुप्ता यांनी असे सांगितले आहे की, संबंधित वेळी त्या नवी मुंबई महानगरपालिका रुग्णालयात कार्यरत होत्या आणि डॉ. शबनम सिंग देखील त्या रुग्णालयात कार्यरत होत्या. पी.डब्ल्यू-४ ने संबंधित रुग्णालयाने दिलेल्या प्रमाणपत्रावर डॉ. शबनम सिंग यांची स्वाक्षरी ओळखली आहे. डॉ. शबनम सिंग यांनी रबाळे पोलिसांनी आणलेल्या सुमारे ३ वर्षांच्या 'एक्स'ची तपासणी केली होती आणि 'एक्स'चे वडील मुलीसोबत होते, असे तिने म्हटले आहे. 'एक्स' च्या वडिलांनी

इतिहास सांगितला होता की अपीलकर्त्याने 'एक्स' ला बेडरूममध्ये नेले होते आणि तिचा लैंगिक छळ केला होता. पी.डब्ल्यू- ४ ने सांगितले की 'एक्स'ने तिला बोटं दाखवली'. 'एक्स' ही सरासरी बांधा असलेली होती, तिची मानसिक स्थिती चांगली होती, असे निदर्शनास आले, परंतु तिला मागे घेण्यात आले.६ वाजताच्या स्थितीत जळजळ दिसून आली. लॅबिया मिनोरावर (लघु भगोष्ठ) लालसरपणा वगळता इतर कोणत्याही जखमा दिसल्या नाहीत; क्लिटोरिसला (शिश्निका) सूज आली होती; ६ वाजताच्या स्थितीत वजाइनल म्युकोसावर (योनी श्लेष्मावर) लालसरपणा आणि वजाइनल फोरचेटवर (योनी भगांजलि) जळजळ दिसून आली. हायमेन (योनिपटल) शाबूत आढळले आणि हाइमन ओरिफिस ने (योनिपटल द्वार )एका बोटाला प्रवेश दिला. डॉ. गुप्ता यांनी नमूद केले आहे की, अभिलेखवलेल्या पूर्ववर्तात लैंगिक अत्याचाराची संभाव्यता दिसून येते, परंतु ती १००% पुरावा म्हणून ग्राह्य धरली जाऊ शकत नाही. डॉक्टरांनी मात्र लैंगिक अत्याचाराची शक्यता नाकारलेली नाही. हा पुरावा पी.डब्ल्यू - १ आणि पी.डब्ल्यू - ५ च्या पुराव्याशी सुसंगत आहे. पी.डब्ल्यू - १ साठी कोणतेही ठोस कारण अभिलेखावर आलेले नाही, जे पी.डब्ल्यू - ५ (वय ५ वर्षे) साठी अपीलकर्त्याला खोटे गुंतविण्यासाठी खूपच कमी कारण आहे, कारण अभिलेखावरील पुराव्यांवरून, फिर्यादी आणि अपीलकर्ता यांच्यातील संबंध सौहार्दपूर्ण असल्याचे दिसून येते आणि हे देखील स्पष्ट आहे की मुली अपीलकर्त्याच्या घरी खेळण्यासाठी जात असायच्या . पी.डब्लू-१ ने दुसऱ्याच दिवशी, म्हणजेच ०५ /१२ /२०१२ ला, दिनांक ०४/१२ /२०१२ ला रात्री ७ :३० ते ८. ०० वाजता घडलेल्या आणि त्याच दिवशी रात्री १०. ०० ते -१०.३० वाजता उघडकीस आलेल्या घटनेसाठी त्वरित फिर्याद /एफआयआर दाखल केली. अशा प्रकारे, अभिलेखावरील पुराव्यांवरून स्पष्टपणे दिसून येते की, अभियोग पक्षाने अपीलकर्त्याविरुद्ध वाजवी संशयापलीकडे आपली बाजू सिद्ध केली आहे.

१२. केवळ तिच्या कोवळ्या वयाचा विचार करून 'एक्स'ची तपासणी करण्यात आली नाही, म्हणून सर्व साक्षीदारांची साक्ष नाकारण्याचा आणि अभियोग पक्षाच्या खटल्यावर विश्वास न ठेवण्याचा आधार असू शकत नाही. वस्तुस्थितीत दोन्ही साक्षीदारांचे पुरावे म्हणजे पी.डब्ल्यू - १ आणि पी.डब्ल्यू - ५ आत्मविश्वास वाढवतात आणि वैद्यकीय पुराव्यांद्वारे योग्य पुष्टी दिली जाते. त्यामुळे फिर्यादीची वस्तुस्थिती तपासून न घेणे हे अभियोगाला मारक नाही.

१३. हे देखील लक्षात घेणे समर्पक आहे की उलटतपासणीत, अपीलकर्त्याचे प्रकरण असे आहे की त्याला या प्रकरणात चुकीच्या प्रकारे गुंतवले गेले; फिर्यादी व सामाजिक कार्यकर्त्यांनी त्याच्यावरील गुन्हा मागे घेण्यासाठी रु.२५,००,०००/- ची मागणी केली होती आणि घटनेपूर्वी फिर्यादी व अपीलकर्ता यांच्यात भांडण झाले होते, त्यानुसार खोटी तक्रार दाखल करण्यात आली होती. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३ अन्वये नोंदविण्यात आलेल्या जबाबात अपीलकर्त्याने घेतलेल्या बचावाशी हा बचाव विरोधाभासी आणि विसंगत आहे. अपीलकर्त्याने प्रश्न क्रमांक ३३ ला दिलेले उत्तर खालीलप्रमाणे आहे;

**प्रश्न क्र.३३**- साक्षीदारांनी तुमच्याविरोधात साक्ष का दिली?

**उत्तर :-** फिर्यादी माझ्या चुलत भावाच्या घरी राहतो आणि माझ्या भावात आणि माझ्यात वाद आहे आणि म्हणून मला चुकीच्या पद्धतीने फसवण्यात आले आहे.

१४. हे लक्षात घेणे समर्पक आहे की अपीलकर्त्याने कोणत्याही साक्षीदाराच्या उलटतपासणीत असा कोणताही बचाव केलेला नाही. खरे तर साक्षीदारांच्या उलटतपासणीचा कालावधी असा आहे की, 'एक्स' आणि पी.डब्ल्यू- ५ नियमितपणे अपीलकर्त्याच्या घरी येत असत; की 'एक्स' ला जेव्हा जेव्हा लघवी करायची असेल तेव्हा अपीलकर्ता तिला लघवी

करायला घेऊन जायचा. अशा प्रकारे, अपीलकर्त्याने घेतलेला खोटा बचाव ही अपीलकर्त्याविरुद्ध अतिरिक्त परिस्थिती आहे. साक्षीदार अपीलकर्त्याला खोटे का गुंतवतील हे दर्शविण्यासाठी कोणतेही ठोस कारण समोर आलेले नाही. वस्तुतः लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ च्या कलम २९ अन्वये अपीलकर्त्याने त्याच्यावर टाकलेल्या भारातून मूक्तही झाला नाही.

१५. अभिलेखावरील परिस्थिती अपीलकर्त्याच्या सहभागाकडे निर्विवादपणे निर्देश करते.

१६ . अभिलेखावरील सामग्री लक्षात घेता, आक्षेपित न्यायनिर्णय आणि आदेशात कोणत्याही प्रकारच्या हस्तक्षेपाची आवश्यकता नाही.त्यानुसार अपील फेटाळले जाते.

**न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे.**

****


<u>अस्वीकरण</u>

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल."

****